# दैनिक वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | बुधवार दि.२५ फेब्रुवारी २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक १८१ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Wednesday 25 Feburary 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 181 | Pages 4 | Rate 4 Rs


## डिजिटल अरेस्ट म्हणजे निव्वळ खोटेपणा

**मुंबई**–देशात आणि राज्यात 'डिजिटल अरेस्ट'च्या माध्यमातून होणाऱ्या फसवणुकीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर आज विधानसभेत आमदार अबू आझमी यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत महत्त्वाची माहिती दिली. कायद्यानुसार 'डिजिटल अरेस्ट' नावाचा कोणताही प्रकार अस्तित्वात नाही. कायद्यात अशी कोणतीही तरतूद नाही. असा कोणताही फोन किंवा व्हिडिओ कॉल आल्यास तो १०० टक्के फ्रॉड आहे हे समजून घ्या, असे स्पष्ट आवाहन मुख्यमंत्र्यांनी राज्यातील जनतेला केले आहे.समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेद्वारे राज्यातील वाढत्या सायबर गुन्ह्यांचा आणि 'डिजिटल अरेस्ट'चा मुद्दा उपस्थित केला होता. मुंबई आणि अहिल्यानगर सारख्या शहरात नागरिक आपली आयुष्यभराची पुंजी गमावत असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. यावर राज्यमंत्री योगेश कदम यांनी सरकारकडून सुरू असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली, तर मुख्यमंत्री फडणवीस यांनी या गुन्ह्यांच्या कार्यपद्धतीवर सविस्तर भाष्य केले.

# सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय

## ५० टक्के आरक्षण ओलांडलेल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका लांबणीवर

मुंबई | प्रतिनिधी–महाराष्ट्राच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील ओबीसी आरक्षणावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. त्यानुसार राज्यातील ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने मनाई केली आहे. राज्यात आता २२ जिल्हा परिषद आणि त्याअंतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांच्या निवडणुका प्रलंबित राहणार आहेत.सर्वोच्च न्यायालयात पार पडलेल्या सुनावणीत अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रलंबित निवडणूक घेण्यास परवानगी देण्याची मागणी राज्य सरकारकडून करण्यात अली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने उर्वरित जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका घेण्यास मनाई केली आहे.





राहुल रमेश वाघ विरुद्ध केंद्र आणि महाराष्ट्र सरकार या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने बांठिया समितीपूर्वीच्या स्थितीनुसार निवडणुका घेण्याचे आदेश दिले होते. मात्र राज्य निवडणूक आयोगाने आरक्षणाची ५० टक्क्यांची कायदेशीर मर्यादा ओलांडल्याने २२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांच्या निवडणुकांना स्थगिती देण्यात आली आहे. सद्यस्थितीत १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुका पार पडल्या असल्या, तरी आरक्षणाच्या या तांत्रिक पेचामुळे उर्वरित २२ जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका आता अनिश्चित काळासाठी प्रलंबित राहण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.राज्यातील ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली गेली आहे, त्या ठिकाणच्या निवडणुकांवरील स्थगिती सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवली आहे. राज्य सरकारच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी 'अंतिम आदेशाच्या अधीन राहून' या निवडणुका घेण्याची परवानगी मागितली होती. मात्र, तांत्रिक गुंतागुंत पाहता सर्वोच्च न्यायालयाने अशी कोणतीही परवानगी देण्यास स्पष्ट नकार दिला आहे.या न्यायालयीन भूमिकेमुळे राज्यातील प्रलंबित असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आता अनिश्चित काळासाठी लांबणीवर पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जोपर्यंत आरक्षणाच्या मर्यादेबाबत कायदेशीर स्पष्टता येत नाही, तोपर्यंत निवडणूक प्रक्रिया पुढे नेण्यास न्यायालयाने हिरवा कंदील दाखवलेला नाही. परिणामी, अनेक जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकांचे भवितव्य सध्या अधांतरी आहे.दुसरीकडे, बांठिया आयोगाने शिफारस केलेल्या ओबीसी आरक्षणाच्या वैधतेवर सर्वोच्च न्यायालय लवकरच अंतिम सुनावणी सुरू करणार आहे. न्यायालयाने सर्व संबंधित वकिलांना या सुनावणीसाठीची पूर्वतयारी पूर्ण करण्याचे निर्देश दिले असून, ही सुनावणी लवकर घेण्याचे संकेत दिले आहेत. या अंतिम निकालावरच राज्यातील ओबीसींचे राजकीय आरक्षण आणि रखडलेल्या निवडणुकांचा मार्ग अवलंबून असेल.

## भारत-उझबेकिस्तान संसदीय मैत्री गटात खासदार बजरंग सोनवणे यांची निवड

दैनिक वादळ वार्ता

**नवी दिल्ली | प्रतिनिधी**

लोकसभा सचिवालयाच्या वतीने भारत-उझबेकिस्तान संसदीय मैत्री गटाची (India-Uzbekistan Parliamentary Friendship Group) १८व्या लोकसभेसाठी स्थापना करण्यात आली असून या गटात बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग मनोहर सोनवणे यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.लोकसभा सचिवालयाच्या परिषद व प्रोटोकॉल शाखेकडून २३ फेब्रुवारी २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या अधिकृत पत्राद्वारे ही माहिती देण्यात आली. लोकसभेचे अध्यक्ष यांच्या मान्यतेने खासदार बजरंग सोनवणे यांची भारत-उझबेकिस्तान संसदीय मैत्री गटाच्या सदस्यपदी नामनिर्देशित करण्यात



आले असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे.भारत आणि उझबेकिस्तान या दोन्ही देशांमधील संसदीय सहकार्य वाढविणे, परस्पर संबंध अधिक दृढ करणे तसेच सांस्कृतिक, आर्थिक व राजनैतिक देवाणघेवाण मजबूत करणे या उद्देशाने संसदीय मैत्री गट कार्यरत असतात. या माध्यमातून दोन्ही देशांतील संसदीय प्रतिनिधींमध्ये संवाद आणि सहकार्य वाढण्यास मदत होते.खासदार बजरंग सोनवणे यांची या महत्त्वपूर्ण गटावर निवड झाल्याने बीड जिल्ह्यासह मराठवाड्याच्या दृष्टीने ही अभिमानास्पद बाब मानली जात आहे. त्यांच्या निवडीमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर स्थानिक प्रश्न मांडण्याची तसेच देशाच्या परराष्ट्र धोरणाशी संबंधित विषयांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे.दरम्यान, भारत-उझबेकिस्तान संसदीय मैत्री गटात सदस्य म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल विविध स्तरांतून खासदार सोनवणे यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## बीड जिल्हा व सत्र न्यायालयातील वकील बंधू ॲड.राम डोंगरे यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा व मारहाणीचा तिव्र निषेध–ॲड.सदानंद वाघमारे

### आरोपींच्या तात्काळ अटकेची मागणी; बीड जिल्हा वकील संघ उद्या कामबंद ठेवणार

दैनिक वादळ वार्ता

**बीड | प्रतिनिधी**

बीड जिल्हा व सत्र न्यायालय परिसरात वकील बंधू ड.राम डोंगरे यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ला व मारहाणीच्या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करत बीड जिल्हा वकील संघाने आक्रमक भूमिका घेतली आहे. या घटनेमुळे संपूर्ण वकील संघात संतापाची लाट उसळली असून आरोपींवर तात्काळ गुन्हा दाखल करून अटक करण्यात यावी व कठोर कारवाई करावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.  या संदर्भात बीड जिल्हा वकील संघाचे सर्व सन्माननीय सदस्य, वकील बंधू तसेच महिला वकील भगिनी यांनी एकत्र येत बीड जिल्हा पोलीस



अधीक्षक तसेच शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे निरीक्षक यांना निवेदन सादर केले. न्यायालयीन परिसरात अशा प्रकारची घटना घडणे अत्यंत गंभीर असून यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. वकील संघाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले की, जो पर्यंत संबंधित आरोपींवर गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली जात नाही. तो पर्यंत हा लढा सुरू राहील. तसेच उद्या दिनांक २५ फेब्रुवारी २०२६ रोजी बीड जिल्हा वकील संघातील सर्व सदस्य कामकाजात सहभागी होणार नसून कामबंद आंदोलन करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे.  या आंदोलनामुळे न्यायालयीन कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता असून प्रशासनाने तात्काळ कारवाई करून न्याय द्यावा, अशी मागणी सर्व स्तरातून होत आहे.

## महसूल विभागासह, शिक्षण विभागाचे अभिनंदन यंदा परीक्षा कॉफी मुक्त–रावसाहेब पाटील शिंदे

दैनिक वादळ वार्ता

**हानुमंत चंदनकर**

शैक्षणिक क्षेत्रात विद्यार्थ्यांचा पाया मजबूत होणे हे भारताचे भविष्य आहे, अधिक सुदृढ आणि समृद्ध होन्यासाठी,परीक्षा ही कॉफी मुक्त होणे काळाची गरज आहे, जागतिक पातळीवर भारताला महासत्ता बनवायचे असेल येणारी पिढी सुशिक्षित तेवढी सुदृढ बनवायची असेल तर परीक्षा खरंच काफीमुक्त व्हायला हवी, या मताचे आम्ही पालक आहोत, यामुळे महसूल प्रशासनाचे आणि शिक्षण विभागाचे करावे तेवढे कौतुक आहे,

महसूल विभागाने कॅमेऱ्यात कैद करण्याचे आदेश दिले प्रत्येक सेंटरवर बारकाईने नजरकैद करून कॅमेऱ्याच्या कैदेत प्रत्येक विद्यार्थी काफी मुक्त परीक्षा देत आहेत,तुम्ही कॉफी मुक्त परीक्षा घेत आहोत विद्यार्थ्याला नजर कैदेत ठेवत आहोत त्याबद्दल येणाऱ्या पिढीसाठी तुमचं खरंच कौतुक आहे, पण पालक वर्गातून महसूल विभागाच्या बाबतीत होत असलेली चर्चा कधी स्वतःही महसूल विभागातल्या कर्मचाऱ्यांनी आपणही काम करते वेळेस नजर कैदेत कॅमेऱ्याच्या नजरेत स्वतःला उभं करून पाहावं सातबारा उतारा लावताना शेतकऱ्याकडून म्हणजेच पालक वर्गाकडून केलेली वसुली घराचा नमुना नंबर ९ लावताना केलेली वसुली बेधुंद वाळू माफिया गोणखणीच्या नावामध्ये



एक रुपया न भरणारे वाळू आणि मुरूम माफिये मात्र महसूल विभागाच्या नजर कैदेतून त्यांच्याच अधिकाऱ्याच्या आणि कर्मचाऱ्यांच्या नजर महेरबाणीने नजर कैदेतून कोसलाम आहेत ज्या पालकांच्या हातातून पैसे घेतलेल्या महसूल विभागाचे कर्मचारी त्यांच्याच पाल्याचे मात्र परीक्षेच्या पेपरच्या दिवशी स्वतः कॅमेरे घेऊन काफी मुक्ती मध्ये काम करत आहेत ते पाहून पालक वर्गात महसूल विभागाने अशीच पारदर्शकता आपल्याबद्दलही बाळगावी हे पालक वर्गातून चर्चा होत आहे, नजर कैद,कॅमेरे समोर आरसा सारखी महसूल विभागाची स्वच्छ प्रतिमा जिल्हाधिकारी साहेब करतील का हीच पालक वर्गाकडून अपेक्षा

## लाडक्या बहिणींनो बँक खाते चेक करा जानेवारीचा हप्ता जमा होण्यास सुरुवात

### ई केवायसी न करणाऱ्या महिलांना ३१ मार्चपर्यंत मुदत

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई | प्रतिनिधी**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांच्या खात्यात जानेवारी महिन्याचा हप्ता वर्ग करण्यास सुरुवात झाली आहे. महिला व बाल कल्याण विभागाने सोमवारपासून ही प्रक्रिया सुरू केली आहे. काल रात्रीपासून आतापर्यंत राज्यातील हजारो महिलांना हे पैसे मिळालेत.मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत पात्र लाभार्थी महिलांना दरमहा १५०० रुपयांचे अर्थसहाय्य केले जाते. फेब्रुवारी महिना संपत आला तरी या महिलांना अद्याप जानेवारी महिन्याचा निधी मिळाला नव्हता. त्यामुळे हा हप्ता केव्हा मिळणार? असा सवाल उपस्थित केला जात होता. अखेर गत १८ फेब्रवारी रोजी सामाजिक न्याय विभागाने महिला व बाल कल्याण विभागाला ९८ कोटींचा निधी वर्ग केल्यानंतर हा हप्ता जारी करण्याचा मार्ग मोकळा झाला होता. त्यानुसार, सोमवार रात्रीपासून पात्र लाभार्थी महिलांना हा हप्ता मिळण्यास सुरुवात झाली आहे. राज्य सरकारने गत डिसेबर महिन्याचा लाभ जानेवारीच्या १४ तारखेला दिला जारी केला होता. त्या अंतर्गत सुमारे १ कोटी ६० लाख महिलांच्या खात्यात रक्कम वर्ग करण्यात आली होती. तत्पूर्वी, सरकारने सर्व लाभार्थ्यांना ई केवायसी करणे बंधनकारक केले होते. त्यात अनेकांची केवायसी चुकल्यामुळे त्यांचे नाव लाभार्थ्यांच्या यादीतून कापले गेले होते. त्यामुळे या योजनेतील पात्र लाभार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी झाली होती.प्रस्तुत योजना जुलै २०२४ रोजी सुरू झाली तेव्हा लाभार्थ्यांचा आकडा २ कोटी ४६ लाखांच्या आसपास होता. त्यानंतर सरकानरे ३१ डिसेंबरपर्यंत ई केवायसीची प्रक्रिया पूर्ण करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर १ कोटी ९० लाख महिला लाभार्थ्यांनी ई केवायसी प्रक्रिया पूर्ण केली होती. त्यापैकी योग्य केवायसी असणाऱ्या १ कोटी ६० लाख महिलांच्या खात्यात सरकारने डिसेंबर महिन्याचे पैसे पाठवले होते. यामुळे केवायसी चुकलेल्या महिलांमध्ये संतापाची लाट उसळली होती. त्यामुळे सरकारने या महिलांना ३१ मार्चपर्यंत नव्याने ई केवायसी करण्याची मुदत दिली आहे. तसेच ही प्रक्रियाही सुटसुटीत केली आहे.उल्लेखनीय बाब म्हणजे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना जुलै २०२४ पासून जानेवारी २०२६ पर्यंत एकूण १९ हप्त्यांची रक्कम मिळाली आहे.

**खाली वाचा कोणत्या महिला योजनेसाठी अपात्र?**

ज्यांच्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा अधिक आहे.ज्यांच्या कुटुंबातील सदस्य आयकरदाते आहेत.

ज्यांच्या कुटुंबातील सदस्य नियमित/कायम कर्मचारी/कंत्राटी कर्मचारी म्हणून सरकारी विभाग/उपक्रम/मंडळ/भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत आहेत किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहेत. परंतु बाह्य यंत्रणाद्वारे कार्यरत असलेले तथा स्वयंसेवी कामगार आणि कर्मचारी अपात्र ठरणार नाहीत.

सदर लाभार्थी महिलेने शासनाच्या इतर विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या आर्थिक योजनेद्वारे १५०० रुपयांपेक्षा जास्त लाभ घेतला असेल.

ज्यांच्या कुटुंबातील सदस्य विद्यमान किंवा माजी खासदार/आमदार आहे.

ज्यांच्या कुटुंबातील सदस्य भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या बोर्ड/कॉर्पोरेशन/बोर्ड/उपक्रमाचे अध्यक्ष/उपाध्यक्ष/संचालक/सदस्य आहेत.

ज्यांच्या कुटुंबातील सदस्यांची संयुक्तपणे पाच एकरपेक्षा जास्त शेतजमीन आहे.

ज्यांच्याकडे चारचाकी वाहने (ट्रॅक्टर वगळून) त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या नावावर नोंदणीकृत आहेत.

# संपादकीय

## स्वच्छ,शाश्वत ऊर्जास्रोत

संयुक्त राष्ट्रांनी ठरवलेली शाश्वत विकास उद्दिष्ट्ये पूर्ण करताना हवामान बदल आणि पर्यावरणाचे रक्षण करणे महत्त्वाचे आहे. यापैकी एक उद्दिष्ट म्हणजे सर्वांना स्वच्छ आणि स्वस्त ऊर्जा मिळावी. हे उद्दिष्ट साधल्यास इतर सर्व उद्दिष्ट्ये पूर्ण करणे सोपे होते. विकसित देश म्हणून गणले जाण्यासाठी दरडोई वार्षिक ऊर्जावापर हा एक महत्त्वाचा निकष आहे. या निकषावर भारत अजून खूप मागे आहे. त्यामुळे भारतासमोर ऊर्जेचा पुरवठा वाढवणे आणि तो पर्यावरणाला अनुकूल स्रोतांतून करणे, ही दुहेरी उद्दिष्ट्ये आहेत. सौर आणि पवन ऊर्जा हे स्वच्छ ऊर्जा स्रोत लवकर उभारता येतात, पण त्यांच्यात ऊर्जेच्या पुरवठ्यातील अनियमितता आणि मोठ्या जागेची गरज यांसारख्या मर्यादा आहेत. याउलट, अणुऊर्जा कमी कार्बन उत्सर्जन करते, कमी जमीन वापरते आणि वर्षभर मोठ्या प्रमाणात ऊर्जा पुरवू शकते. हा एक सिद्ध झालेला आणि भारतात विकसित झालेला ऊर्जा स्रोत आहे. १९५४ मध्ये अणुऊर्जा विभागाची स्थापना झाली आणि तेव्हापासून भारताने अणुतंत्रज्ञान विकसित करण्यावर भर दिला आहे.अणुऊर्जा प्रकल्प केवळ दीर्घकालीन ऊर्जा सुरक्षाच देत नाहीत, तर आरोग्य, अन्नसुरक्षा आणि इतर अनेक क्षेत्रांमध्येही मोठे सामाजिक फायदे देतात. अमेरिकेच्या मदतीने तारापूर येथे १९६९ मध्ये पहिले अणुऊर्जा केंद्र सुरू झाले. त्यानंतर कॅनेडियन हेवी वॉटर रिक्टर तंत्रज्ञानावर लक्ष केंद्रित केले गेले. सुरुवातीला कॅनडा आणि अमेरिकेने मदत केली, पण १९७४ च्या अणुचाचणीनंतर त्यांनी पाठिंबा काढून घेतला. तरीही, भारताने स्वतःच्या कौशल्यावर आधारित अणुइंधन उत्पादन आणि औद्योगिक क्षमता वाढवली. आता भारतात ७०० मेगावॉट क्षमतेच्या अणुभट्ट्या उभारल्या जात आहेत. फास्ट ब्रीडर रिक्टर तंत्रज्ञानही विकसित झाले आहे आणि ५०० मेगावॉट क्षमतेचे युनिट लवकरच कार्यान्वित होईल. रशियाच्या मदतीने १००० मेगावॉट क्षमतेचे दोन प्रेशराइज्ड वॉटर रिक्टर युनिट्सही उभारले जात आहेत. अणुऊर्जा विभागाने संशोधन, अभियांत्रिकी, बांधकाम आणि संचालन या सर्वच बाबतीत कौशल्य मिळवले आहे. ६५० हून अधिक अणुभट्टी वर्षांचा सुरक्षित आणि उच्च-क्षमतेचा अनुभव हे याचेच द्योतक आहे. अणुऊर्जा नियामक मंडळाच्या कडक नियमांमुळे आणि सुरक्षिततेच्या संस्कृतीमुळे हे शक्य झाले आहे.केंद्र सरकारने अणुऊर्जा क्षमतेचा विस्तार करण्याचा घेतलेला निर्णय स्वागतार्ह आहे. भारतीय तंत्रज्ञांमध्ये अणुऊर्जा क्षेत्रातील गुंतागुंतीचे तंत्रज्ञान विकसित करण्याची क्षमता आहे. ते उच्च सुरक्षा मानके आणि आव्हानात्मक औद्योगिक प्रक्रिया हाताळण्यात पारंगत आहेत. अणुऊर्जा प्रकल्पातील सुरक्षितता म्हणजे किरणोत्सर्गापासून मनुष्य आणि पर्यावरणाचे संरक्षण. हे डिझाइनपासून ते प्रकल्पाच्या अखेरपर्यंत सर्व टप्प्यांवर जपले जाते. उपकरणांची विश्वासार्हता महत्त्वाची आहे, कारण ती संयंत्रांच्या कार्यकाळात सहज उपलब्ध नसतात आणि वीजनिर्मिती नसतानाही ती बंद पडू नयेत. उच्च किरणोत्सर्गी इंधनाच्या सुरक्षिततेसाठी, अणुभट्टीतून बाहेर काढल्यानंतरही, विश्वासार्ह शीतलक साधनांची गरज असते. अणुऊर्जा क्षेत्रातील नवीन कंपन्यांनी सिद्ध झालेले तंत्रज्ञान आणि प्रशिक्षित टीम्सवर लक्ष केंद्रित करावे. अणुऊर्जा विभागातील अनुभवी लोकांचे मार्गदर्शन त्यांना उपयुक्त ठरेल. १०० गिगावॉट वीज निर्मिती क्षमता गाठण्यासाठी अणुऊर्जा विभागाने या राष्ट्रीय सामर्थ्याला अधिक गती देणे आवश्यक आहे.भारतासमोर ऊर्जेची वाढती मागणी पूर्ण करणे आणि त्याच वेळी पर्यावरणाचे रक्षण करणे, ही एक मोठी जबाबदारी आहे. संयुक्त राष्ट्रांनी ठरवलेली शाश्वत विकास उद्दिष्ट्ये याच दिशेने वाटचाल करतात. या उद्दिष्टांमध्ये स्वच्छ आणि परवडणारी ऊर्जा मिळवणे हे एक महत्त्वाचे लक्ष्य आहे. जर आपण हे लक्ष्य गाठले, तर इतर अनेक सामाजिक आणि पर्यावरणीय उद्दिष्ट्ये आपोआपच पूर्ण होऊ शकतात. विकसित देश म्हणून गणले जाण्यासाठी दरडोई वार्षिक ऊर्जावापर हा एक महत्त्वाचा निकष आहे. या निकषावर भारत अजूनही खूप मागे आहे, हे वास्तव स्वीकारायला हवे. त्यामुळे, भारताला एकाच वेळी दोन आघाड्यांवर लढावे लागत आहे: एक म्हणजे ऊर्जेचा पुरवठा वाढवणे आणि दुसरे म्हणजे हा पुरवठा पर्यावरणाला हानी न पोहोचवणाऱ्या स्रोतांतून करणे.सौर ऊर्जा आणि पवन ऊर्जा हे स्वच्छ ऊर्जेचे उत्तम स्रोत आहेत. त्यांची उभारणी तुलनेने लवकर करता येते. मात्र, या ऊर्जा स्रोतांच्या काही मोठ्या मर्यादा आहेत. ऊर्जेच्या पुरवठ्यात अनियमितता असू शकते, म्हणजे जेव्हा ऊन नसेल किंवा वारा नसेल, तेव्हा वीज निर्मिती थांबते. तसेच, मोठ्या प्रमाणात वीज निर्मितीसाठी खूप मोठ्या जमिनीची आवश्यकता असते. या समस्यांवर मात करण्यासाठी अणुऊर्जा एक चांगला पर्याय ठरू शकते. अणुऊर्जा प्रकल्पांमधून कार्बन उत्सर्जन जवळजवळ नसते. ते कमी जमीन वापरतात आणि वर्षभर मोठ्या 'लोड फॅक्टर'वर ऊर्जा पुरवू शकतात. हा एक सिद्ध झालेला आणि भारतात विकसित झालेला ऊर्जा स्रोत आहे.भारतात अणुऊर्जा क्षेत्राचा प्रवास १९५४ मध्ये अणुऊर्जा विभागाच्या स्थापनेपासून सुरू झाला. स्थापनेनंतर लगेचच, भारताने विकसित राष्ट्रांच्या बरोबरीने येण्यासाठी अणुतंत्रज्ञानाशी संबंधित सर्व घटक भारतातच विकसित करण्यावर भर दिला. यासाठी योग्य ती पावले उचलण्यात आली. गेल्या अनेक वर्षांपासून देशात अणुऊर्जा क्षेत्रात अत्यंत काळजीपूर्वक उभारलेली ही शक्तिस्थाने केवळ दीर्घकालीन ऊर्जासुरक्षेची हमीच देत नाहीत, तर आरोग्य, अन्नसुरक्षा आणि इतर अनेक क्षेत्रांमध्येही मोठे सामाजिक फायदे देतात.भारतातील अणुऊर्जा प्रकल्पाचा पहिला टप्पा अमेरिकेच्या मदतीने सुरू झाला. १९६९ मध्ये महाराष्ट्रातील तारापूर येथे अमेरिकेच्या 'जनरल इलेक्ट्रिक कंपनी'ने पुरवलेल्या प्रत्येकी २०० मेगावॉट क्षमतेच्या दोन बॉयलिंग वॉटर रिक्टर युनिट्स असलेले पहिले अणुऊर्जा केंद्र कार्यान्वित झाले. याचा कार्यभार अणुऊर्जा विभागाने स्वीकारला. त्याच सुमारास, देशातील औद्योगिक क्षमतांचा विचार करून, स्वदेशीकरणाला सोयीस्कर ठरेल आणि भविष्यात प्रगत विकासाची शक्यता असलेल्या कॅनेडियन हेवी वॉटर रिक्टर तंत्रज्ञानावर लक्ष केंद्रित करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला. या कॅनेडियन तंत्रज्ञानावर आधारित, प्रत्येकी २२० मेगावॉट क्षमतेच्या पहिल्या दोन युनिट्सचे बांधकाम 'टोमिक एनर्जी ऑफ कॅनडा लिमिटेड'च्या सहकार्याने करण्यात आले. विशेष म्हणजे, या युनिट्ससाठी आवश्यक असलेली काही महत्त्वाची उपकरणे भारतीय उद्योगांनीच तयार केली होती आणि त्यांचे बांधकाम, कार्यान्वयन आणि संचालन भारतीय तज्ज्ञांनीच केले होते. या प्रकल्पातील पहिल्या युनिटने १९७३ मध्ये व्यावसायिक वीज निर्मिती सुरू केली. मात्र, दुसरे युनिट पूर्ण होण्यापूर्वीच, भारताने १९७४ मध्ये केलेल्या पहिल्या अणुचाचणीनंतर कॅनडा आणि अमेरिकेने आपला पाठिंबा काढून घेतला.

# पंचायत समिती मैदान,केज येथे १ मार्चला भव्य सांस्कृतिक सोहळा व गौरव पुरस्कार वितरण

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व विविध पत्रकार संघटनांचा संयुक्त उपक्रम मान्यवरांच्या उपस्थितीत होणार विविध क्षेत्रातील दिग्गजांचा सन्मान

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

शहरातील पंचायत समिती मैदान, शिक्षक पतपेढी केज येथे दि. ०१ मार्च २०२६ रोजी सायं. ०५.०० वा. भव्य सांस्कृतिक कार्यक्रम व गौरव पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई, राष्ट्रीय पत्रकार संघ केज, पुरोगामी पत्रकार संघ तसेच सह्याद्री पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने हा सोहळा पार पडणार असून, विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा यावेळी सन्मान करण्यात येणार आहे.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. हारुणभाई इनामदार हे राहणार असून उद्घाटन सौ. सिताताई बनसोड यांच्या हस्ते होणार आहे. विशेष अतिथी म्हणून बीड लोकसभेचे खासदार मा. श्री. बजरंग (बप्पा) सोनवणे, राज्यसभेच्या खासदार मा. सौ. रजनीताई पाटील तसेच केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार मा. सौ. नमिता अक्षय मुंदडा यांची उपस्थिती लाभणार आहे.याशिवाय शिवसेनेच्या उपनेत्या मा. सौ. संगिताताई ठोंबरे, ज्येष्ठ नेते मा. श्री. रमेशराव आडसकर, सामाजिक कार्यकर्त्या डॉ. अंजलीताई घाडगे यांच्यासह विविध राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. मा. श्री. राकेश गिड्डे, मा. श्री. सागर पठाडे, मा. डॉ. अशोक थोरात, मा. श्री. संतोष हंगे, मा. श्री. राहुल सोनवणे, मा. श्री. भाई मोहन गुंड, मा. श्री. शंकर जाधव, मा. श्री. अदित्यदादा पाटील आदींसह अनेक मान्यवरांची विशेष उपस्थिती सोहळ्याला लाभणार आहे.या कार्यक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे विविध क्षेत्रांतील कर्तृत्ववान व्यक्तींना प्रदान करण्यात येणारे गौरव पुरस्कार. उत्कृष्ट नगराध्यक्षा गौरव पुरस्कार सौ. सिताताई बनसोड, केज भूषण गौरव पुरस्कार डॉ. हारुणभाई चांदपाशा इनामदार, आदर्श डॉक्टर गौरव पुरस्कार डॉ. बालासाहेब अस्वले, अष्टपैलू समाज गौरव पुरस्कार हनुमंत भौसले सर यांना प्रदान करण्यात येणार आहे.

तसेच उत्कृष्ट नगरसेवक गौरव पुरस्कार राजुभाई इनामदार, पँथर भूषण गौरव पुरस्कार दिपक कांबळे, क्रीडा प्रशिक्षक गौरव पुरस्कार विनोद गुंड, उत्कृष्ट अभिनेता गौरव पुरस्कार प्रजेनजिन राहुल गायकवाड,




उत्कृष्ट अधिपदीचारीका गौरव पुरस्कार ज्योती विलास आरखडे यांचाही सन्मान करण्यात येणार आहे.प्रशासकीय व पत्रकारिता क्षेत्रातील योगदानाची दखल घेत उत्कृष्ट प्रशासकीय सेवा गौरव पुरस्कार श्री. राकेश गिडे साहेब, पत्रकारिता जीवन गौरव पुरस्कार धनंजय कुलकर्णी, उत्कृष्ट पत्रकारिता गौरव पुरस्कार संतोष गालफाडे, पत्रकारिता संघर्ष गौरव पुरस्कार महादेव गायकवाड, निर्भीड पत्रकारिता गौरव पुरस्कार गौतम बचुटे यांना देण्यात येणार आहेत.शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातही उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा गौरव करण्यात येणार असून आदर्श शिक्षक गौरव पुरस्कार प्रा. धनराज भालेराव, उत्कृष्ट सामाजिक कार्य गौरव पुरस्कार अरविंद थोरात, उत्कृष्ट युवा उद्योजक गौरव पुरस्कार महेश तपसे तसेच समाजसेवक गौरव पुरस्कार महादेव कराड वृद्धाश्रम यांना प्रदान केला जाणार आहे.सांस्कृतिक कार्यक्रमांच्या रंगतदार सादरीकरणासह हा सोहळा केज तालुक्यासाठी प्रेरणादायी ठरणार आहे. विविध क्षेत्रांतील कार्यकर्त्यांचा सन्मान करून समाजातील सकारात्मक कार्याला चालना देण्याचा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन पत्रकार तथा वादळ वार्ता या दैनिकाचे संपादक श्री. अजय भांगे यांनी केले आहे.

# महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा निर्धार; २०४७ पर्यंत ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे लक्ष्य

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य विधानमंडळाच्या २०२६ च्या पहिल्या अधिवेशनाच्या प्रारंभी राज्यपालांनी आपल्या अभिभाषणातून राज्य सरकारच्या विविध विकासात्मक उपक्रमांचा आढावा घेतला. विकसित महाराष्ट्र - २०४७ या दूरदृष्टी आराखड्याअंतर्गत राज्याची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

राज्याने २०२४-२५ या वर्षात १,६४,८७५ कोटी रुपयांची थेट परकीय गुंतवणूक आकर्षित करून देशात प्रथम क्रमांक मिळवला असून, ही एकूण एफडीआयपैकी ३९ टक्के आहे. दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत सुमारे ३० लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करार करण्यात आले असून, त्यातून सुमारे ४० लाख रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. महाराष्ट्र उद्योग, गुंतवणूक व सेवा धोरण-२०२५ अंतर्गत ७० लाख ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आणि ५० लाख रोजगारांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच स्टार्टअप धोरणाद्वारे पुढील पाच वर्षांत १,२५,००० उद्योजक घडविण्याचा मानस व्यक्त करण्यात आला. पायाभूत सुविधांच्या विकासासाठी १,१०० कि.मी. लांबीच्या १४७ रस्ते प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली असून, समृद्धी महामार्गाचा विस्तार वाढवण बंदर व पूर्व विदर्भापर्यंत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महा-इन्व्हिट उपक्रमाद्वारे पायाभूत प्रकल्पांसाठी खासगी गुंतवणुकीस चालना दिली जाणार आहे. शेती क्षेत्रासाठी विविध महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर करण्यात आले. ७.५ अश्वशक्तीपर्यंतच्या कृषी पंपांना मोफत वीज पुरवठा, ६.६३ लाख सौर पंपांची स्थापना, किमान आधारभूत किंमतीत कापूस व सोयाबीन खरेदी, तसेच नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना १५,५७६ कोटी रुपयांची मदत थेट खात्यात वर्ग करण्यात आली आहे. महिलांच्या सक्षमीकरणासाठी उमेद अभियानांतर्गत ६.६० लाख स्वयं-सहायता गट स्थापन करण्यात आले असून, २६ लाखांहून अधिक महिला 'लखपती




दीदी' बनल्या आहेत. आदिवासी महिलांसाठी राणी दुर्गावती महिला सक्षमीकरण योजना सुरू करण्यात येणार आहे. आरोग्य क्षेत्रात अवयव प्रत्यारोपणासाठी ९ प्रकारच्या शस्त्रक्रिया मोफत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच सर्वसमावेशक कर्करोग उपचार सेवा धोरणाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. शिक्षण क्षेत्रात सीईटी परीक्षा वर्षातून दोनदा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्यासाठी विद्यार्थी सुरक्षा, संरक्षण व मानसिक कल्याण धोरण-२०२५ लागू करण्यात आले आहे. तंत्रशिक्षणातील १५४ विषयांचे शैक्षणिक साहित्य मराठीत उपलब्ध करून देण्यात आले आहे. पर्यटन व सांस्कृतिक वारशाच्या जतनासाठी अष्टविनायक, तुळजाभवानी, त्र्यंबकेश्वर आदी तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी ३६६१ कोटी रुपयांची मंजुरी देण्यात आली आहे. राज्यातील १२ किल्ल्यांचा युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश झाल्याचा अभिमान व्यक्त करण्यात आला. राज्य सरकार सर्वसमावेशक, प्रगत आणि विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी कटिबद्ध असल्याचे राज्यपालांनी अधोरेखित केले. आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात विविध विधेयके व अर्थसंकल्पीय प्रस्ताव मांडण्यात येणार असून, राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सदस्यांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

# महावितरण भांडुप परिमंडलात टीओडी स्मार्ट मीटर वापरणाऱ्या ग्राहकांना मिळाली ७ कोटी ८९ लाखाची सवलत

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील ग्राहकांचे पारंपरिक मीटर बदलून सर्व ठिकाणी अत्याधुनिक टीओडी स्मार्ट मीटर लावण्यात येत आहेत. स्मार्ट मीटरमुळे ग्राहकांना आपल्या रियल टाईम वीज वापराची माहिती मिळते. स्मार्ट मीटरमध्ये दिवसाच्या वेगवेगळ्या वेळेनुसार विजेचा वापर मोजला जातो व त्यावेळेच्या दरानुसार आकारणी केली जाते. विशेष म्हणजे, दि. १ जुलै २०२५ पासून शहरी व ग्रामीण भागातील सर्व लघुदाब घरगुती व उच्चदाब हाऊसिंग सोसायटी वीजग्राहकांना दररोज सकाळी ९ वाजे पासून ते सायंकाळी ५ वाजेच्या दरम्यान वीज वापर करणाऱ्या टीओडी मीटर धारकांना ८० पैसे प्रति युनिट सवलत मिळत आहे. महावितरणच्या भांडुप परिमंडलात आतापर्यंत २७ लाख ५५ हजार ८०३ वीज देयकांमध्ये स्मार्ट मीटर लावून या



विशिष्ट वेळेत वीजवापर करून रु. ७ कोटी ८९ लाखाची सवलत घेतली आहे. महावितरणच्या भांडुप परिमंडलात स्मार्ट मीटर वापर करून वीजबिलात सवलत घेणाऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. सदर, सुविधा सुरु झाल्यापासून आतापर्यंत पेण मंडळातील ९ लाख ०२ हजार ४९४ वीज देयकांमध्ये १ कोटी ३९ लाख ६३ हजार रुपयांची टीओडी सवलत मिळाली आहे. त्याचप्रमाणे, ठाणे मंडळातील ८ लाख ७६ हजार ४६७ वीज देयकांमध्ये ३ कोटी १८ लाख १२ हजार तर वाशी मंडळातील ९ लाख ७६ हजार ८४२ वीज देयकांमध्ये ३ कोटी ३१ लाख ५३ हजार एवडी टीओडी सवलत घेतली आहे. आतापर्यंत, पेण, ठाणे व वाशी हे तिन्ही मंडळ मिळून लघुदाब घरगुती वीज ग्राहकांनी या विशिष्ट वेळेत वीजवापर करून रु. ७ कोटी ८९ लाख २९ हजार रुपयांची सवलत घेतली आहे. मुख्य अभियंता, भांडुप परिमंडल, श्री. संजय पाटील म्हणाले कि, राज्यात सुरु असलेल्या स्मार्ट मीटर पंधरवडा दरम्यान अनेक ग्राहकांनी स्मार्ट मीटर लावले आहेत. स्मार्ट मीटरमध्ये दिवसाच्या वेगवेगळ्या वेळेनुसार विजेचा वापर मोजला जातो व त्यावेळेच्या दरानुसार आकारणी केली जाते. तसेच, शहरी व ग्रामीण भागातील सर्व लघुदाब घरगुती व उच्चदाब हाऊसिंग सोसायटी वीजग्राहकांना दररोज सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीमध्ये वापरलेल्या विजेसाठी प्रतियुनिट ८० पैसे ते १ रुपया टप्प्या-टप्प्याने सवलत मिळते. स्मार्ट मीटर ग्राहकांसाठी विनामूल्य असून जास्तीत जास्त ग्राहकांनी स्मार्ट मीटर लाऊन त्याचा लाभ घ्यावा.

# पनवेल पोलिसांच्या कर्तव्याला दाद गुजरातमधून ट्रकसह आरोपी ताब्यात!

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून तब्बल ५५ लाख रुपये किमतीचा टाटा कंपनीचा टिपर ट्रक मध्यरात्री चोरीस गेला आणि अवघ्या ८ तासांच्या आत गुजरातमधून जप्त करण्यात आला. तक्रारदार भास्कर घाडगे यांच्या मालकीचा डंपर क्रमांक चक ४३ उघ ३०१८ हा करंजाडे सेक्टर २ए परिसरातून १९ फेब्रुवारी २०२६ रोजी मध्यरात्री चोरीस गेला होता. तक्रार मिळताच पनवेल पोलिसांनी तात्काळ गुन्हा दाखल करून तपासाची चक्रे वेगाने फिरवली. वाहनामध्ये बसवलेल्या GPS प्रणालीच्या मदतीने पोलिसांनी लोकेशन ट्रॅक केले. तपासादरम्यान वाहन पालघरमार्गे गुजरातच्या दिशेने जात असल्याचे स्पष्ट झाले. क्षणाचाही विलंब न लावता विशेष पथक तयार करण्यात आले आणि थरारक पाठलाग करून वाहन महाराष्ट्राची हद्द ओलांडून गुजरातमध्ये प्रवेश करताच पालघर LCB आणि वलसाड LCB यांच्याशी समन्वय साधण्यात आला. गुजरात राज्यातील पारदी पोलीस ठाणे हद्दीत वाहन असल्याची माहिती मिळताच संयुक्त कारवाई करत आरोपीला हरियाणाकडे पळ काढण्याआधीच जेरबंद करण्यात आले. या प्रकरणात मुरसलिम मकसूद खान, वय ३० वर्षे, रा. हरियाणा याला अटक करण्यात आली आहे. चोरीस गेलेला डंपर सुरक्षितपणे जप्त करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. या यशस्वी कारवाईसाठी पनवेल शहर पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि कर्मचारी तसेच पालघर आणि वलसाड डउइ यांचे मोलाचे सहकार्य लाभले. गुन्हेगार कितीही लांब पळाला तरी कायद्याच्या हातातून सुटका नाही ! हे पनवेल शहर पोलिसांनी पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.

सदरची कारवाई सहाय्यक पोलिस आयुक्त पनवेल विभाग, वपोनि नितीन ठाकरे, पनवेल शहर पोलीस स्टेशन यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उप.नि/ विनोद लभडे, पोहवा/२०६८ परेश म्हात्रे, पोहवा/११२३ योगेश दिवेकर, पोहवा/१३७८ अविनाश गांथडे, पोहवा/१८५१महेंद्र वायकर, पोना/२८३१ विनोद देशमुख ,पोना / ३२९० सम्राट डाकी, पो.उप.नि/ गोरख राठोड, नेम. पालघर डउइ , पो.उप.नि/ राकेश तळपडे, नेम. वलसाड LCB, गुजरात , PC/योगेश, नेम. वलसाड LCB, गुजरात यांच्यामार्फत करण्यात आली.

# बारूळ नगरीत माता रमाई आंबेडकर जयंती उत्साहात महिला मंडळाचा प्रेरणादायी पुढाकार

**दैनिक वादळ वार्ता**
**कंधार । प्रतिनिधी**

कंधार तालुक्यातील बारूळ नगरीत त्याग, संयम आणि समर्पणाचे प्रतीक असलेल्या माता रमाई आंबेडकर यांची जयंती दिनांक २२ फेब्रुवारी २०२६ रोजी अत्यंत भक्तिभाव, आदर आणि मंगलमय वातावरणात साजरी करण्यात आली. संपूर्ण गावात कृतज्ञतेची भावना दरवळत होती. बुद्ध वंदना, जयभीमच्या घोषणांनी आणि प्रेरणादायी विचारांनी परिसर दुमदुमून गेला होता.

या जयंती सोहळ्याचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण आयोजनाची जबाबदारी महिला मंडळाने खांद्यावर घेतली आणि अत्यंत शिस्तबद्ध व नियोजनबद्ध पद्धतीने कार्यक्रम यशस्वी करून दाखवला. महिला शक्तीने एकजुटीने उभारलेला हा उत्सव समाजातील स्त्री सामर्थ्याचा जिवंत आदर्श ठरला. नियोजन, सजावट, पाहुण्यांचे स्वागत, भोजन व्यवस्था ते सांस्कृतिक कार्यक्रम-प्रत्येक बाबतीत महिला मंडळाची कार्यतत्परता आणि समर्पण स्पष्टपणे जाणवत होते.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ठीक ११ वाजता बारूळ येथील बुद्ध विहारात झाली. ज्येष्ठ उपासिका विठाबाई शंकरराव लोहबंद यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्या क्षणी उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात माता रमाई यांना अभिवादन केले. त्यानंतर तपोवन (गोळेगाव) येथील बोधिधम्मो यांनी आपल्या ओजस्वी प्रवचनातून माता रमाई यांच्या संघर्षमय जीवनाचा भावस्पर्शी आढावा घेतला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी कुटुंबाची जबाबदारी सांभाळत सामाजिक परिवर्तनाच्या कार्याला दिलेला हातभार याचे त्यांनी हृदयस्पर्शी वर्णन केले. त्यांच्या त्याग, सहनशीलता आणि अढळ निष्ठेचे उदाहरण देत उपस्थितांना सामाजिक बांधिलकीची जाणीव करून दिली.

दुपारच्या सत्रात भीम अनुयायांनी सामूहिक भोजनाचा आस्वाद घेतला. बंधुभाव, समानता आणि एकात्मतेची भावना यावेळी प्रकर्षाने जाणवली. सायंकाळी सात वाजता वातावरण अधिकच भारावून गेले, जेव्हा गावातील चिमुकल्यांनी माता रमाई यांच्या जीवनचरित्रावर प्रभावी आणि ओघवती भाषणे केली. लहानग्यांच्या तोंडून ऐकू आलेले संघर्ष आणि त्यागाचे शब्द उपस्थितांच्या डोळ्यांत पाणी आणणारे ठरले. तसेच माता रमाई यांच्या जीवनावर आधारित गीतांवर सादर करण्यात आलेल्या बहारदार नृत्यांनी उपस्थितांची मने जिंकली.

यावेळी शांताबाई लक्ष्मणराव वाघमारे यांनी माता रमाई यांच्या योगदानावर अभ्यासपूर्ण व प्रेरणादायी भाषण केले. त्यांनी सांगितले की, माता रमाई यांचे जीवन हे केवळ एका कुटुंबापुरते मर्यादित नसून ते संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी दीपस्तंभ आहे. त्यागातूनच परिवर्तनाचा मार्ग निर्माण होतो, हा संदेश त्यांनी ठळकपणे मांडला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एल. एस. वाघमारे यांनी प्रभावी शैलीत केले, तर जळबाजी सोनकांबळे यांनी उपस्थितांचे आभार मानले. संपूर्ण कार्यक्रमात शिस्त, उत्साह आणि भक्तिभाव यांचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.

अध्यक्ष, सचिव, सदस्य यांच्यासह बारूळ नगरीतील बौद्ध उपासक-उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिला मंडळाच्या अथक परिश्रमामुळे हा जयंती उत्सव केवळ एक औपचारिक कार्यक्रम न राहता सामाजिक जागृतीचा आणि कृतज्ञतेचा सशक्त संदेश देणारा सोहळा ठरला.बारूळ नगरीत साजऱ्या झालेल्या या जयंतीने एकच संदेश दिला-त्याग आणि समर्पणानेच समाज परिवर्तनाचा मार्ग उजळतो, आणि त्या मार्गावर माता रमाई यांचे कार्य आजही दीपस्तंभासारखे मार्गदर्शन करत आहे.



# संत गाडगेबाबाचे समाजसेवा आणि स्वच्छते बद्दलचे कार्य आजही प्रेरणादायी-दस्तूरकर

**दैनिक वादळ वार्ता**
**हदगांव । प्रतिनिधी**

संत गाडगेबाबाचे समाजसेवा आणि स्वच्छतेबद्दल चे कार्य आजही प्रेरणादायी मानले जाते असे प्रतिपादन पंचशील हायस्कूल चे मुख्याध्यापक अनिल दस्तूरकर यांनी संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त पंचशील माध्य. व उच्च माध्य. विद्यालयात प्रतिमा पूजन करून अभिवादन करताना केले.

याप्रसंगी पर्यवेक्षक एम. आर.बेळकुंदे,शाळा प्रशासन प्रमुख संदीप ढोले,परीक्षा प्रमुख सुनील सूर्यवंशी,हरीश सोनुले,ज्युनिअर कॉलेजचे समन्वयक प्रा.पी.एल.देशमुख आदी उपस्थित होते.



पुढे बोलताना मुख्याध्यापक दस्तूरकर म्हणाले की,गाडगेबाबांनी स्वच्छता,शिक्षण आणि अंधश्रद्धा निर्मूलन यासाठी आयुष्यभर कार्य केले.त्यांनी गावोगावी फिरून कीर्तनाच्या माध्यमातून लोकांना स्वच्छतेचे आणि सदाचाराचे महत्त्व पटवून दिले.स्वतः झाडू घेऊन गाव साफ करणे हा त्यांचा संदेश देण्याचा प्रभावी मार्ग होता.त्यांनी धर्मशाळा,विद्यार्थी वसतिगृहे,गोशाळा आणि शाळा सुरू केल्या.जातिभेद,मद्यपान आणि अंधश्रद्धा याविरुद्ध त्यांनी आवाज उठवला.असे सांगून गाडगे बाबांच्या कार्याला उजाळा देत दस्तूरकर यांनी अभिवादन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ओमकार मुधोळ यांनी केले

# औसा पंचायत समितीत भाजप ला मीळालेली सत्ता मत विभाजनामुळे ,म.न.से जिल्हाध्यक्ष शिवकुमार नागराळे

**दैनिक वादळ वार्ता**
**औसा । प्रतिनिधी**

औसा तालुक्यात झालेल्या जिल्हा परीषद व औसा पंचायत समिती निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला मीळालेली ,मते ही विरोधकांच्या मत विभाजनावर मीळालेली असल्याच नागराळे यांनी सांगीतले ,



औसा पंचायत समितीच्या १८ पैकी ११ जागा जिंकत भाजपने सत्ता राखली खरी पण हा विजय स्वत:च्या बळावर नव्हे तर विरोधकांच्या मत विभाजनावर झालेला विजय आहे. भारतीय जनता पक्षाने साम-दाम-दंड-भेद जात-पात,धर्म या सगळ्या अस्त्राचा वापर करून झुंडशाहीने विजय मिळवलेला असून काही ठिकाणी बोगस मतदान देखील झाले आहे. लोकांना वास्तव माहित व्हावे यासाठी त्याचे पूरावे देखील निवडणूक आयोगाला लवकरच सादर करण्यात येणार आहेत. निवडणूक जिंकण्याच्या उद्देशाने नाहीतर कुणाला तरी पाडण्याच्या उद्देशाने उभे राहीलेले-उभे केलेले काही हौसे,नवसे,गवसे उमेदवार त्यांचे ध्येय साध्य झाल्याने आता विरोधी पक्षाच्या विजयी उमेदवाराच्या गळ्यात गळे घालून फिरत असल्याचे चित्र दिसून येत आहे.मात्र येणाऱ्या विधानसभांच्या निवडणुकात यांना सत्तेचा चढलेला माज अन् सत्तेची धुंदी मतदार निश्चित उतरवतील.वाईटाची शक्ती मोठी असते परंतु ती अल्पकाळ टिकणारी असते हे या लोकांनी ध्यानात घ्यावे. यावेळी निवडून आलेल्या काही उमेदवारामुळेच भविष्यात लातूर ग्रामीण आणि औसा विधानसभा भाजपाला गमवावी लागणार आहे.हे मात्र निश्चित.निवडणुक काळात मतदारांना अनेक प्रलोभ्न देत आश्वासनाचा भडीमार करत धनशक्तीचा भरपुर प्रमानात वापर झाला व औसा तालुक्यात तर भारतीय जनता पक्षाने विरोधात विरोधकच ठेवायचा नाही अशी युक्ती अवलंबली पण जनतेने कीतीही नेते एकत्र आले पण मतदारांनी मात्र या नेत्यांना तोंडघशी पाडत मतदारांनी आपली ताकद दाखवली ,सत्तेच्या जोरावर एकमेकांच्या विरोधात लढलेले सोबत घेउन आपण एकहाती सत्ता काबिज करु पाहणार्यांना जनतेने नाकारले असल्याच पहायला मीळाले ,असे महाराष्ट्र नवनिर्मान सेनेचे लातुर जिल्हाध्यक्ष शिवकुमार नागराळे यांनी बोलताना सांगीतले

# औसा तालुक्यातील अनेक गावोगावी शेतरस्त्यावरील पवनचक्कीची वाहतुक थांबवा,मराठा शिवसेवक समिती जिल्हाध्यक्ष आकाश पाटील

**दैनिक वादळ वार्ता**
**औसा । प्रतिनिधी**

औसा तालुक्यातील सर्वत्र शेतकर्यांच्या हक्काच्या शेतरस्त्यांवरून पवनचक्की साहित्य व जास्त वजनी अवजड वाहनांची वाहतूक दीवसेंदिवस वाढतच असुन शेताला जाण्यासाठी शेतकर्यांना असलेल्या रस्त्याने पवनचक्की साहित्य असलेले अवजड वाहने ये जा करुन रस्त्याची बिकट अवस्था होउन रस्त्याची दुरावस्था झाली आहे त्यामुळे पवनचक्कीच्या वाहने तात्काळ बंद करण्यासाठी मराठा शिवसेवक समिती जिल्हाध्यक्ष आकाश पाटील यांनी औसा तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली मागणी.

औसा तालुक्यातील विविध गावांमध्ये सध्या पवनचक्की प्रकल्पासाठी अत्यंत अवजड वाहनांची वाहतूक शेतरस्त्यांवरून मोठ्या प्रमाणावर सुरू आहे.औसा तालुक्यातील बहुतांश शेतरस्ते हे केवळ शेतकऱ्यांच्या दैनंदिन शेती उपयोगासाठी असलेले कच्चे व अरुंद रस्ते आहेत.त्यात पानंद रस्ते ,पायवाट रस्ते असुन या रस्त्यांची रचना अवजड व जड व्यावसायिक वाहनांसाठी करण्यात आलेली नाही. तरीदेखील शेतकर्यांना कोणतीही पूर्वसूचना, सार्वजनिक हरकतीची प्रक्रिया अथवा शेतकऱ्यांची संमती न घेता या रस्त्यांवरून मोठ्या अवजड ट्रेलर, ट्रक व क्रेन यांची वाहतूक करण्यात येत आहे.

या अवजड वाहतुकीमुळे -

शेतरस्त्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे,शेतकर्यांचे शेतीबांध बांध, नाल्या व पिकांचे नुकसान होत आहे,

शेतकऱ्यांना शेती दैनंदिन प्रवासात ये-जा करण्यास अडथळा निर्माण होत आहे,

व अपघाताची गंभीर शक्यता निर्माण झाली आहे,

ग्रामस्थ व शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.

सदर वाहतूक ही शेतरस्त्यांच्या मूळ उद्देशाला बाधा आणणारी असून शेतकऱ्यांच्या हक्कांवर गदा आणणारी आहे.

त्यामुळे मी एक शेतकर्याच लेकरु मनून शेतकर्यांची होत असलेली रस्त्याची नास धुस पाहुन आज औसा तहसीलदार यांना आज नम्र विनंती पुर्वक निवेदन देउन शेतकरी रस्त्यावरील वाहतुक बंद करण्याची मागणी केली आहे व प्रशासनाने दखल घेउन

औसा तालुक्यातील सर्व शेतरस्त्यांवरून पवनचक्की व इतर अवजड वाहनांची वाहतूक तात्काळ बंद करण्याचे आदेश द्यावेत.व

संबंधित कंपन्यांना केवळ मान्यताप्राप्त सार्वजनिक रस्त्यांचा (झथऊ/महामार्ग) वापर करण्याचे निर्देश द्यावेत.

शेतरस्त्यांचे झालेले नुकसान याची तत्काळ पाहणी करून संबंधित कंपन्यांकडून झालेल्या रस्त्याची दुरुस्ती व नुकसान भरपाई करून द्यावी.व

परवानगीशिवाय विनापरवाना शेतरस्त्यांचा वापर करणाऱ्यांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी.व वरील प्रश्न बाबिवर तात्काळ कार्यवाही न झाल्यास, औसा तालुक्यातील शेतकरी व ग्रामस्थ लोकशाही मार्गाने, शांततापूर्ण व कायदेशीर आंदोलन करतील याची संबंधित प्रशासनाने नोंद घ्यावी. या परिस्थितीत उद्भवणाऱ्या कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नास संबंधित यंत्रणा जबाबदार राहतील.ही मागणी औसा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या सामूहिक हितासाठी असून तातडीची आहे. याची त्वरित दखल घेण्यात यावी.अशी विनंती पुर्व निवेदन मराठा शिवसेवक समिती महाराष्ट्र राज्य लातुर जिल्हाध्यक्ष आकाश प्रकाश पाटील व औसा तालुकाध्यक्ष राहुल मोरे यांनी निवेदना द्वारे तहसीलदार यांना मागणी केली आहे.



# शिवरायांच्या विचाराची दंगल घडवा-प्रा.विशाल गरड



**दैनिक वादळ वार्ता**
**भूम । प्रतिनिधी**

जातीच्या धर्माच्या नावाने दंगली घडविण्या पेक्षा शिवरायांच्या विचारांची दंगल घडवा असे प्रतिपादन प्रा विशाल गरड यांनी हाडोंग्री येथे शिवजयंती निमित्ताने केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिवरायांच्या प्रतिमीला पुष्पहार अर्पण प्रा विशाल गरड बाळासाहेब मुळे सरपंच संदीप मगर यांच्या हस्ते केली.

शिवजयंती आयोजित व्याख्यानमालेत प्रा गरड म्हणाले शिवरायांच्या विचारांची शिवजयंती प्रत्येक गावागावात साजरी झाली पाहिजे.प्रत्येक मावळ्यांनी शिवरायांचे शिवचरित्र अभ्यास करून आत्मसात करावे.भारतीय राज्य घटनेने महिलांना ५०टक्के आरक्षण दिले आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार दिला.बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वरानी आंतरजातीय पहिला विवाह लावून दिला.डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रह वेळी शिवरायांचा जय घोष केला असे नातं होतं या महामानवांचे आणि आपण वादविवाद करतो त्यांच्या नावाने . महापुरुषांच्या नावाने वाद विवाद करण्यापेक्षा त्यांचे विचार तरुण पिढी ने आत्मसात करून जंयतीदिवशी विचारांची देवाणघेवाण करावी. मद्यपान मुक्त शिवरायाची जयंती साजरी झाल्या पाहिजे तरच आपण शिवरायांचे मावळे म्हणून घ्यावे असे मत त्यांनी व्यक्त केले.याप्रसंगी अँड दत्ता जावळे सुधीर क्षीरसागर काशिनाथ जावळे जोतिराम कदम उपसरपंच रवींद्र लोमटे ज्ञानेश्वर क्षीरसागर संतोष क्षीरसागर प्रशांत कदम विश्वजित पाटील आशिष नवले आदीने परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे आभार सुत्रसंचलन बाळासाहेब मुळे यांनी केले.

# लहान मुलांना होतो भटक्या कुत्र्या पासून इजा

**दैनिक वादळ वार्ता**
**पिपंळगाव । प्रतिनिधी**

पिपंळगाव फाटा :भटक्या कुत्र्याची समश्या दिवसेंदिवस वाढत आहे अलीकडीलच्या काळा मध्ये विविध शहरामधून सोशल मीडियाच्या माध्यमातून समोर येणाऱ्या घटना मध्ये लहान मुले शाळकरी विधार्थी महिला आणि जेष्ठ नागरिक यांच्यावर भटक्या कुत्राच्या हल्याच्या घटना वाढताना दिसत आहे ही परस्थिती केवळ भीतीदायक नाही तर सार्वजनिक शूरक्षेसाठी ही मोठा धोका ठरत आहे भटके कुत्रेही समश्या अचानक निर्माण झालेली नाही शहरामध्ये उगड्यावर टाकला जाणारा कचरा उरलेले अन्न मोकळ्या जागवार होणारी अस्वच्छता आणि पाळीव प्रण्यांना रस्त्यावर सोडून देण्याची प्रऊती या कारणामुळे त्याच्या संकेत खुप मोठी वाढ झाली आहे जेव्हा या कुत्राचे



लसीकरण होत नाही देख भाल होत नाही तेव्हा ते आचनक आक्रमन करण्याची शकेता वाढते परिणामी नागरिका च्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होतो.विशेषता शाळकरी मुलासाठी हि परस्थिती धोकादायक ठरत आहे सकाळी आणि संध्याकाळी शाळेत ये -जा करताना अनेक ढीकानी कुत्र्याचे टोळके आढळतात महिला आणि जेष्ठ नागरिकांना हि एकट्याने बाहेर पडताना भीती वाटू लागली आहे ठिकाणी सायकल दुचाकी याच्यावर हल्याचा नागरिकांना मध्ये अशरक्षितते भावना वाडीस लागली आहे या क्षमसेवर तोडगा काढण्या साठी स्थानिक स्वराज्य प्राव्हेट ढोस आणि नियोजनबद्ध उपयोजना करण्याची गरज आहे भटक्या कुत्राचे मोठ्या निबीजकरण (ABC)कर्यक्रम नियमित लसीकरण तसेज त्याची नोंद आणि नियंत्रण यावर भर देणे आवश्यक आहे त्याच बरोबर शहरातील कचरा वेवस्तीत सुदारनार उगड्यावर अन्न उपलब्ध होणार नाही याची काळजी घेणे तितकेच महत्वाचे आहे या सोबत नागरिकांनी जबाबदारी कमी नाही पाळीव प्राणी पाळल्यानंतर त्याची योग देखभाल करणे आणि त्याना रस्त्यावर सोडू ण देणे रस्त्यावर कचरा ण टाकणे टाळावे तसेच भटक्या प्राणी बाबत आपली जबाबदारी चांगल्या प्रकारे भिमिका घेणे गरजेचे आहे प्राणी मित्र आणि प्रशासन याच्या सम्पर्क वाढऊन मानव आणि प्राणी याच्यातील हि काळजी गरज आहे भटके कुत्रे हि केवळ प्राणीची समशा नाही तर ती सार्वजनिक आरोग्य सुरक्षिता आणि शहर व्यवस्थापनासि संबंधित नागरिक आणि सामाजिक संस्था यांनी संपर्क करून संकटावर प्रभावी नियंत्रण मिळवता येईल स्वच्छ गाव तातडीने होईल...

# हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या भव्य पुतळ्याची उभारणी व समृद्धी महामार्गावरील सुविधांबाबत आठ दिवसांत सभागृहाला अवगत करावे-उपसभापती डॉ.गोऱ्हे यांच्या सूचना

## जनतेच्या तक्रारींची दखल घ्या; फूड जॉईंट्सची प्रत्यक्ष नोंद दाखवा-डॉ.नीलम गोऱ्हे

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

आज हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख मा. बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने रस्ता उभारण्यात आलेल्या ठिकाणी त्यांचा भव्य पुतळा उभारण्याची घोषणा होऊनही तीन वर्षे उलटून गेल्यानंतरही कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा मुद्दा विधानपरिषद सदस्य हेमंत पाटील यांनी लक्षवेधी द्वारे विधान परिषदेत उपस्थित केला होता.हा पुतळा नेमक्या किती दिवसांत उभारला जाणार? असा प्रश्न त्यांनी सरकारकडे केला.यावर उत्तर देताना राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी, पूर्ण माहिती घेतल्यानंतरच मी याबाबत बोलू शकेन. सन्माननीय सदस्यांना संपूर्ण माहिती घेऊन कळवू, असे सांगितले.या चर्चेदरम्यान पीठासीन अधिकारी म्हणून उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितले की, हा विषय केवळ एका सदस्यापुरता मर्यादित नसून जनतेशी निगडित आहे. अधिवेशन सुरू असताना सरकारने आठ दिवसांच्या आत याबाबत सविस्तर लेखी निवेदन सादर करावे, अशी त्यांनी विनंती केली.तसेच समृद्धी महामार्गावर सुरू असल्याचे सांगितल्या जाणाऱ्या २२ फूड जॉईंट्सबाबत प्रत्यक्षात सुविधा उपलब्ध नसल्याच्या तक्रारी येत असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. संबंधित अधिकाऱ्यांकडून त्या २२ ठिकाणांची सकाळी व संध्याकाळी स्थिती दर्शवणारे व्हिडिओ रेकॉर्डिंग करून पुढील आठवड्यात दाखवावे, अशीही त्यांनी सूचना केली. आम्ही आमदारांनी वारंवार सांगण्यापेक्षा प्रशासनानेच प्रत्यक्ष स्थिती स्पष्ट करावी. आम्हाला व संबंधित आमदारांना प्रत्यक्ष दाखवा, असे त्यांनी नमूद केले.महिलांच्या स्वच्छतागृहांच्या सुविधांबाबतही समस्या कायम असल्याचे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले. मी स्वतः नुकतीच नाशिकला जाऊन आले असून पुन्हा भेट देणार आहे. कागदोपत्री कामे पूर्ण दाखवली जात असली तरी प्रत्यक्षात काही ठिकाणी सुविधा उपलब्ध नाहीत, अशा तक्रारी लोकांकडून येत आहेत. सुपरव्हिजनमध्ये काही त्रुटी राहात आहेत का, याचीही तपासणी होणे आवश्यक आहे, असे त्या म्हणाल्या.समृद्धी महामार्गावरील सुविधा, रेस्टॉरंट्स व सेवा केंद्रांची अचूक माहिती गुगल मॅपवर अद्ययावत करण्याची गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले, जेणेकरून प्रवाशांना प्रत्यक्ष सुरू असलेल्या सुविधा सहज उपलब्ध होतील.



# गेवराई येथे पतसंस्था संचालक कर्मचारी सहकारी प्रशिक्षण वर्ग संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित पुणे चे सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर,मा.जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था बीड यांच्या संयुक्त विद्यमाने गेवराई तालुक्यातील नागरी, ग्रामीण,कर्मचारी पत संस्थेतील संचालक, कर्मचारी यांच्याकरिता दि.२३ फेब्रुवारी ते दि.२४ फेब्रुवारी २०२६ रोजी दोन दिवसीय सहकार प्रशिक्षण घेण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.श्री. लक्ष्मीनारायण जी अट्टल चेअरमन जयप्रकाश नागरिक सहकारी संस्था मर्यादित गेवराई,तसेच कार्यक्रमाचे उद्घाटक मा. श्री.दीपक पवळ सहाय्यक निबंधक सहकारी संस्था गेवराई यांच्या हस्ते राष्ट्रसंत श्री गाडगे महाराज यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आले.दोन दिवसीय प्रशिक्षणात पहिल्या सत्रात श्री.पी.ए. कदम सहकार विकास अधिकारी बीड जिल्हा सहकारी बोर्ड लिमिटेड बीड



यांनीप्रशिक्षणार्थींची नोंदणी व सहकारी संस्थेचे संचालक, कर्मचारी यांना सहकारी प्रशिक्षणाची गरज,हेतू स्पष्ट सांगितला तसेच मा.श्री दीपकजी पवळ यांनी तालुक्यातील सहकारी संस्थांना सविस्तर मार्गदर्शन करून कायदेशीर बाबीच्या सूचना देण्यात आल्या.त्यानंतर कर्ज वाटप व्यवस्थापन,कर्ज वसुली कलम १०१ मधील तरतुदी,पतसंस्था कामकाजाचे व्यवस्थापन या विषयावर मा.श्री. जयप्रकाश शर्मा मुख्य कार्यकारी अधिकारी वसुंधरा नागरी सहकारी बँक यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.मध्यांतर नंतर बीड जिल्ह्यातील मार्गदर्शक सहकार व्याख्याते तज्ञ मा.श्री. खोडसे सी.ए.प्रमाणित लेखापरीक्षक सहकारी संस्था बीड यांनी ठेवी सुरक्षितता,कर्ज वाटप करताना कायदेशीर बंधने,एनपीए,थकबाकी दारावर कायदेशीर कार्यवाही,पतसंस्था लेखापरीक्षण माहिती निकष,पतसंस्था एम. आय.एस.माहिती निकष,अशा विविध विषयावर सविस्तर मोलाचे मार्गदर्शन केले. दुसऱ्या दिवशी सहकार प्रशिक्षण केंद्र लातूरचे प्राचार्य बी.जे.ठोंबरे यांनी नियामक मंडळाचे संपूर्ण माहिती,तत्कालीन सहकार कायद्यातील झालेले बदल,नवीन शासकीय परिपत्रक, कायदेशीर बाबी व्यवस्थापन समितीचे कामकाज याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी मा.श्री दीपकजी पवळ सहाय्यक निबंधक सहकारी संस्था गेवराई, मा.श्री.लक्ष्मीनारायण जी अट्टल यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन,आभार प्रदर्शन संयोजक श्री.पी. ए.कदम सहकार विकास अधिकारी बीड जिल्हा बोर्ड सहकारी बोर्ड लि. बीड यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन व यशस्वीरित्या पार पाडण्यात जयप्रकाश नागरी सहकारीपतसंस्था मर्यादित गेवराई यांचे संचालक मंडळ, चेअरमन,सचिव, कर्मचारी वृंद यांनी मोलाचे सहकार्य केले.

# संत गाडगेबाबांनी शिक्षणाचा पुरस्कार करत माणूस बनण्याचा संदेश दिला-डॉ.वसुदेव गायकवाड



दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता.केज जि.बीड येथे दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ रोजी संत गाडगेबाबा जयंती साधेपणाने साजरी करण्यात आली.सर्व प्रथम संत गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पुजन करून वंदन करण्यात आले. प्रमुख उपस्थिती एस.के. वैरागे,आर्यन गायकवाड, सुशांत सौदागर,ज्ञानेश्वर गायकवाड,कमलाकर साबळे,जनार्धन गायकवाड,विक्रम गायकवाड,बबन गायकवाड,रामकृष्ण तात्या गायकवाड यांची उपस्थिती होती. अध्यक्षीय समारोप ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वक्ते व परखडव्याख्याते, प्राचार्य,डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केला. संत गाडगेबाबांनी शिक्षणातून माणूस बनण्याचा संदेश दिल्याचे प्रतिपादन डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.दिनांक २२ फेब्रुवारी २०२६ रोजी क्रिकेट स्पर्धा घेण्यात आल्या. खेळ हा जीवनाचा अविभाज्य भाग बनावा व आपले क्रियाक्षेत्रातही श्रेष्ठत्व सिध्द करावे असे आवाहन बक्षीस वितरण समयी डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.

## दिपाली राऊत राष्ट्रीय युवा चेतना पुरस्काराने सन्मानीत,चिंचोली माळीच्या शिरपेचात मानाचा तुरा

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील रहीवाशी कु.दिपाली सरिता राजेंद्र राऊत या युवतीला काव्यमित्र संस्थेच्या वतीने आयोजित छत्रपती शिवाजी महाराज व राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या जयंती निमित्त पुणे येथे राष्ट्रीय युवा चेतना पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.याविषयी सविस्तर वृत्त असे की,जिद्द, चिकाटी,मेहनत व सातत्यपुर्ण प्रयत्नाने ग्रामीण भागात राहुन, तसेच वडिलांचे छत्र हरपलेले असताना देखील न डगमगता स्वतः च्या पायावर उभारण्याची आस मनी बाळगून केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील रहीवाशी कु.दिपाली राऊत हिने शेवग्याच्या पाल्यापासुन मोरींगा पावडर,कडीपत्ता पावडर तसेच वेगवेगळ्या प्रकारचे उत्पादन तारिणी उद्योगसमुहाच्या माध्यमा तून सुरु केले आहे.आणि या उद्योग समुहाची यशस्वी वाटचाल चालू आहे.याची दखल घेऊन





पुणे येथील काव्यमित्र संस्थेच्या वतीने आयोजित छत्रपती शिवाजी महाराज व राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या जयंती निमित्त राष्ट्रीय युवाचेतना पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.या कार्यक्रमाचे मुख्य संयोजक श्री.राजेंद्र विमलाई श्रीमंत सगर संस्थापक अध्यक्ष, काव्यमित्र संस्था हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून मा.श्री.संभाजीराजे जाधवराव (सिंदखेड राजा),राजे लखोजी जाधवराव यांचे १४ वे वंशज हे होते.व मा.श्री. व्ही.जे.वाघमारे सर राज्याध्यक्ष-विस्तार अधिकारी पंचायत समाजकल्याण व आय.आर.डी.पी.संघटना यांच्या शुभहस्ते राष्ट्रीय युवाचेतन पुरस्कार हा मानाचा पुरस्कार तारिणी उद्योग समूहाला प्रदान करण्यात आला.यावेळी बोलताना हा पुरस्कार आमच्यासाठी अत्यंत अभिमानास्पद आणि प्रेरणादायी क्षण आहे.समाजासाठी गुणवत्ता,प्रामाणिकपणा आणि स्वावलंबन या तत्त्वांवर काम करत राहण्याची ही मोठी पावती आहे.या सन्माना बद्दल आयोजकांचे मनःपूर्वक आभार. भविष्यातही अधिक जोमाने आणि निष्ठेने कार्य करत राहू,हीच ग्वाही.तारिणी उद्योग समूह आपल्या विश्वासा साठी सदैव कटिबद्ध राहणार असे आश्वासन कु.दिपाली राऊत हिने दिले आहे.

# वादळी वाऱ्यासह बीड जिल्ह्यात अतिवृष्टी पाऊस

## ज्वारी,गहू आणि आंबा तसेच इतर पिकांचे अतोनात नुकसान-श्री गायके राजू

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

दि. रविवारी झालेल्या वादळी वाऱ्यासह पाऊस आणि वेगांच्या कडकडाटासह बीड जिल्ह्यात बऱ्याचशा गावामध्ये शेतकऱ्यांचे ज्वारी,गहू, हरभरा, आंबा तसेच इतर पिके व बागांचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे ज्वारी गहू मका हे पिके सर्वच्या सर्व भुई सपाट झालेली आहेत. तरी ज्या भागामध्ये खूप मोठे नुकसान झालेले आहे त्या भागामध्ये शासनाने लवकरात लवकर पंचनामा करून, लवकरच शासनाला रिपोर्ट द्यावा. जेणेकरून वेळेत शेतकऱ्यांना मदत मिळेल असे आवाहन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री राजू गायके यांनी प्रसिद्धी पत्रकार केले आहे.

याचा फटका बीड तालुक्यातील पारगाव शिरस, नवगण राजुरी, पेंडगाव आदी महसूल






मंडळात खापर पांगरी, सौंदाना, दगडी साजनपूर, उमरद जहागीर, पारगाव शिरस, शहाजनपूर, कुमसी, कांबी, पेंडगाव, कामखेडा, आहेर चिंचोली, या गावामध्ये खूप मोठ्या प्रमाणामध्ये शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे तरी याची दखल घेऊन वेळीच कार्यवाही करण्यात यावी जेणेकरून याचा मोबदला लवकरात लवकर शेतकऱ्यांना मिळेल आणि यामधून शेतकऱ्यांना दिलासा मिळेल. फुल ना फुलाची पाकळी मिळेल जेणेकरून शेतकऱ्यावर अन्याय होणार नाही याची नोंद सरकार दरबारी घ्यावी असे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री राजू गायके यांनी कळवले आहे.

## चौसाळा येथील हजरत सैलानी बाबा संदलच्या अध्यक्षपदी प्रथमेश वाघमारे तर सचिवपदी प्रशांत सोनवणे

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी बीड तालुक्यातील चौसाळा येथील हिंदु मुस्लिम एकतेचे प्रतीक असलेल्या हजरत सैलानी बाबा संदल निमित्त शासकीय विश्रामगृह चौसाळा येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते याबैठकीमध्ये सर्वानुमते अध्यक्षपदी प्रथमेश वाघमारे तर उपाध्यक्षपदी अमोल सोनवणे व सचिवपदी प्रशांत सोनवणे तर खजिनदार म्हणून अंकुश(तात्या )सोनवणे यांची निवड करण्यात आली या बैठकीस बापू पवार,ग्रामपंचायत सदस्य सुरज सोनवणे,ग्रामपंचायत सदस्य आमोल कांबळे,विशाल सोनवणे, शैलेश सोमीनाथ सोनवणे, आकाश सोनवणे, रवी सोनवणे, दादू गायकवाड, धर्मा सोनवणे, प्रेम गायके, विशाल काळे, साहील सोनवणे इत्यादी उपस्थित होते तर प्रसिध्दी प्रमुख म्हणून चौसाळा पत्रकार संघाचे अध्यक्ष विवेक कुचेकर, पत्रकार पंडित



जोगदंड, पत्रकार मिराज मुलानी, पत्रकार बळीराम राऊत,पत्रकार ख्वाजाभाई जहागिरदार यांची निवड करण्यात आली.

## हरडफ येथे राष्ट्रसंत गाडगेबाबांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन; ग्रामस्वच्छतेचा व सामाजिक समतेचा संकल्प!

दैनिक वादळ वार्ता

**हदगाव । प्रतिनिधी**

कीर्तनाच्या माध्यमातून समाजप्रबोधन करणारे, ग्रामस्वच्छतेचा संदेश देणारे आणि आयुष्यभर अंधश्रद्धा निर्मूलन व सामाजिक समतेसाठी झटणारे थोर समाजसुधारक राष्ट्रसंत गाडगेबाबा यांची जयंती हरडफ येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी गाडगेबाबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी गाडगेबाबांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा आणि समाजहितासाठी सदैव कार्य करण्याचा संकल्प केला. हाती झाडू आणि मुखी कीर्तन या गाडगेबाबांच्या मूळ मंत्राचा अवलंब करून गाव स्वच्छ, सुंदर आणि व्यसनमुक्त ठेवण्याचे आवाहन यावेळी उपस्थित



मान्यवरांनी केले.

मान्यवरांची उपस्थिती

या कार्यक्रमाला हरडफ परिसरातील अनेक मान्यवर आणि ग्रामस्थांनी मोठी उपस्थिती लावली होती. यामध्ये प्रामुख्याने:

✻ शिवाजीराव जाधव पाटील (संस्थापक अध्यक्ष, हिंदवी स्वराज्य)

✻ स्वप्निल दादा कदम (युवा नेते)

✻ रवी कुमार सूर्यवंशी (वकील साहेब)

✻ (ग्रामपंचायत सदस्य)राजु पाटील मोरे! प्रहार चे कार्यकर्ते भास्कर पाटील सुर्यवंशी

✻ तुकाराम शिंदे,! , (युवा सेनेचे कार्यकर्ते ) शरद पाटील हरडफकर! सुदन शेतकरी, दिनेश पाटील

✻ आकाश कदम, राजू वारकड, विलास सूर्यवंशी

तसेच माजी सरपंच राजू जाधव,! जगन्नाथ जाधव, विष्णू मोकळे, प्रदीप सूर्यवंशी, गजानन जाधव, सुदर्शन धोंगडे, भागवत मोरे, दत्ता जाधव, बाळू जाधव, दीपक जाधव यांच्यासह सर्व हरडफ ग्रामस्थ मंडळी उपस्थित होती. कार्यक्रमाची सांगता गाडगेबाबांच्या विचारांच्या स्मरणाने आणि ग्रामस्वच्छतेच्या निर्धाराने करण्यात आली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077